## नियमित दिवाणी मुकदमा नं. ४५/२०१७ मधील
## निशाणी ४० वरील आदेश

**(रमेश धुरी व.५ वि. गुणाजी धुरी व.१६)**

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे अभिलेखावर दाखल करुन त्यांनी दिलेल्या कैफियतीमध्ये दुरुस्ती होवून मिळण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रस्तुतचा दावा व नियमित दिवाणी दावा क्र.९६/२०१८ चा दावा यामधील दावा विषय एकच आहे. तसेच वाद विषयातील वादी व प्रतिवादी हे देखील एकच पक्षकार असून त्याचे स्पष्टीकरण करण्याकरिता व वाद विषयात विसंगती येवू नये याकरिता प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी दुरुस्ती सुचवून तशी दुरुस्ती त्यांनी दिलेल्या कैफियतीमध्ये करणेस परवानगी मिळणेची विनंती प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जास वादी यांनी निशाणी १४५ वर म्हणणे सादर करुन सदर अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनानुसार सदर अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. तसेच मागत असलेली दुरुस्ती अर्जात नमुद मजकुर हा प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये परिच्छेद क्र.१२ मध्ये नमुद केलेला आहे. त्यामुळे सुचविलेली दुरुस्ती न केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे दुरुस्ती अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत कामी विलंब व्हावा याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजुर करावा अशी विनंती वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

४. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी निशाणी १४६ वर दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान प्रस्तुतचा दावा व नियमित

दिवाणी दावा क्र. ९६/२०१८ चा दावा प्रलंबित असून त्या दोन्ही प्रकरणातील वाद विषय व पक्षकार हे सारखेच आहेत. सदरची बाब वादी यांनी त्यांचे निशाणी १४५ वरील म्हणण्यामध्ये अथवा निशाणी १४६ वरील लेखी युक्तीवाद दरम्यान नाकारलेली नाही. वादी यांनी प्रतिवादी यांच्या प्रस्तुत अर्जास घेतलेली हरकत पहाता ती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात येण्याकरिता तसेच दाव्यांची व अर्जांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज न्यायाचे कारणास्तव मंजुर करणे गरजेचे असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर सन २०१८ मध्ये दाखल केलेला असून प्रस्तुतचा दावा हा सन २०१७ मध्ये दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी यांना मिळणे देखील न्यायोचित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेशः–

**आदेश**

१. प्रतिवादी यांचा निशाणी ४० वरील अर्ज, खर्च रक्कम रुपये ५००/– सह मंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी वादी यांना दिल्यानंतर सुचविलेली दुरुस्ती प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये करुन दुरुस्त कैफियत अभिलेखावर १४ दिवसांचे आत अथवा पुढील नेमले तारखेस सादर करावी.

सही/–

दिनांक –२३/०९/२०२५.

(जी.ए.कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
कुडाळ.